RNI No. MAHBIL /2009/31733

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-अ

वर्ष ११, अंक १२६(४)] गुरुवार, ऑक्टोबर ९, २०२५/आश्विन १७, शके १९४७ [पृष्ठे ३, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक ४५७**

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### अल्पसंख्यांक विकास विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ९ ऑक्टोबर २०२५.

### अधिसूचना

**एकत्रित वक्फ व्यवस्थापन, सक्षमीकरण, कार्यक्षमता आणि विकास अधिनियम, १९९५.**

क्रमांक वक्फ २०२५/प्र.क्र.५१/कार्यासन-४.– ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने, एकत्रित वक्फ व्यवस्थापन, सक्षमीकरण, कार्यक्षमता आणि विकास अधिनियम, १९९५ (१९९५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ४३) (पूर्वी "वक्फ अधिनियम" म्हणून ओळखला जाणारा) च्या कलम ८३ च्या उपकलम (१) व (४) अन्वये तसेच त्या संदर्भातील सर्व सक्षम अधिकारांचा उपयोग करून, अल्पसंख्याक विकास विभागाची शासन अधिसूचना क्र. वक्फ-२०१५/प्र.क्र.१४२/डेस्क-४, दि.१ ऑगस्ट २०१७ (यापुढे "सदर शासन अधिसूचना" म्हणून उल्लेखित) द्वारे महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकरण, औरंगाबाद येथे स्थापन केलेले आहे, जे वक्फ किंवा वक्फ संपत्तीशी संबंधित कोणताही वाद, प्रश्न अथवा इतर बाबी, भाडेकरूंची बेदखली किंवा अशा संपत्तीच्या भाडेकरू व मालक यांचे अधिकार व कर्तव्ये निश्चित करण्यास पात्र आहे आणि ज्यास संपूर्ण महाराष्ट्र राज्यावर अधिकारक्षेत्र आहे;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने, शासन अधिसूचना, अल्पसंख्याक विकास विभाग, क्र. वक्फ-२०२०/प्र.क्र.९६/डेस्क-४, दिनांक ९ फेब्रुवारी २०२४ अन्वये, श्री. अनीस शेख, निवृत्त उपसचिव, यांची वरील अधिनियमातील कलम ८३ च्या उपकलम (४) मधील पोट-कलम(ब) नुसार, राज्य नागरी सेवेतील अतिरिक्त जिल्हाधिकारी पदाच्या समकक्ष अधिकारी या संवर्गातून सदस्य म्हणून नियुक्ती केली होती;

आणि ज्याअर्थी, श्री. अनीस शेख यांनी महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून अनेक वर्षे काम पाहिले आहे, व त्यांच्या कार्यकाळात दिलेले आदेश सध्या वक्फ न्यायाधिकरणासमोर आव्हानित आहेत, तसेच ते सध्या न्यायाधिकरणाचे सदस्य असल्यामुळे अशा प्रकरणांच्या सुनावणीस ते सहभागी राहणे न्यायाधिकरणाच्या हितास बाधक आहे; त्यामुळे, महाराष्ट्र शासनास त्यांच्या सदस्य पदाची नियुक्ती रद्द करणे आवश्यक व उचित वाटते;

म्हणून, एकत्रित वक्फ व्यवस्थापन, सक्षमीकरण, कार्यक्षमता आणि विकास अधिनियम, १९९५ (१९९५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ४३) च्या कलम ८३ च्या उपकलम (४) मधील पोट कलम (ब) तसेच महाराष्ट्र राज्य वक्फ नियम, २०२२ मधील नियम ४९ व महाराष्ट्र सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम, १९०४ (१९०४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. I) मधील कलम १६ अन्वये आणि त्या संदर्भातील सर्व सक्षम अधिकारांचा उपयोग करून, महाराष्ट्र शासन, श्री. अनीस शेख यांची महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकरणाच्या सदस्य म्हणून केलेली नियुक्ती रद्द करीत आहे आणि त्यासाठी अल्पसंख्याक विकास विभागाचा शासन अधिसूचना क्र. वक्फ-२०१५/प्र.क्र.१४२/डेस्क-४, दिनांक १ ऑगस्ट २०१७ मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करीत आहे :–

सदर शासन अधिसूचनेतील संलग्न तक्त्यामध्ये, अनुक्रमांक २ मध्ये, स्तंभ (२) मधील "श्री. अनीस शेख" हे शब्द वगळण्यात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**मिलिंद शेणॉय,**
शासनाचे उप सचिव.

## MINORITIES DEVELOPMENT DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, Dated the 9th October 2025.

*NOTIFICATION*

UNIFIED WAQF MANAGEMENT, EMPOWERMENT, EFFICIENCY AND DEVELOPMENT ACT, 1995.

No.Waqf 2025/C.R.51/Desk-4.- Whereas, the Government of Maharashtra has, in exercise of the powers conferred by sub-sections (*1*) and (*4*) of section 83 of the Unified Waqf Management, Empowerment, Efficiency and Development Act, 1995 (43 of 1995) (earlier known as Waqf Act) and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra *vide* Government Notification, Minorities Development Department No.Waqf-2015/C.R.142/Desk-4, dated the 1st August 2017 (hereinafter referred to as "the said notification") has constituted the Maharashtra State Waqf Tribunal, at Aurangabad, for the determination of any dispute, question or other matter relating to a waqf or waqf property, eviction of a tenant or determination of rights and obligations of the lessor and the lessee of such property, under the said Act, having jurisdiction over whole of the State of Maharashtra ;

And whereas, the Government of Maharashtra has, *vide* Government Notification, Minorities Development Department, No. Waqf 2020/CR No. 96/Desk-4 dated 09th February 2024, appointed Shri. Anees Shaikh, Retired Deputy Secretary, as a member of the said Tribunal from the category of officer from the State Civil Services equivalent in rank to that of the Additional District Magistrate as per clause (*b*) of sub-section (*4*) of section 83 of the said Act ;

And whereas, Shri Anees Shaikh had held the position of Chief Executive Officer of the Maharashtra State Waqf Board for several years and the orders passed by him are challenged before the Waqf Tribunal and being he is a member of the Tribunal, it is his duty to participate in the hearing of the matters, which is prejudicial to interest of the Tribunal. Therefore the Government of Maharashtra considers it expedient to cancel the appointment of Shri. Anees Shaikh, as member of the said Tribunal ;

Now, therefore, in exercise of the powers conferred by clause (*b*) of sub-section (*4*) of section 83 of the Unified Waqf Management, Empowerment, Efficiency and Development Act, 1995 (43 of 1995) read with rule 49 of the Maharashtra State Waqf Rules, 2022 and section 16 of the Maharashtra General Clause Act (I of 1904) and of all other powers enabling it in that behalf; the Government of Maharashtra hereby cancels the appointment of Shri. Anees Shaikh as a Member of the said Tribunal and for that purpose amend the Government Notification, Minority Development Department, No. Waqf 2015/C.R.142/Desk-4, dated the 1st August 2017, as follows :-

In the Table appended to the said notification, in serial no.2, in column (2) the word "Shri. Anees Shaikh" shall be deleted.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

MILIND SHENOY,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.